नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत दुसरा हप्ता लाभार्थ्यांना अदा करण्यासाठी रु.१७९२ कोटी इतका निधी वितरीत करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक पूरक-२०२३/प्र.क्र.२२९/११-अे,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २१ फेब्रुवारी, २०२४

वाचा :-

१) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.किसनि- २०२३/ प्र.क्र.४२/११-अे, दि.१५.६.२०२३.
२) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.पीएफएम-२०२३/प्र.क्र.७२/२-अे, दि.२८.७.२०२३
३) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.पूरक-२०२३/प्र.क्र.८३/११-अे, दि.१०.१०.२०२३
४) संचालक(वि.प्र.), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र.कृ.गणना/न.शे.म.नि./निधी वि.नस्ती/ २४०४/२०२४, दि.१९.१.२०२४

प्रस्तावना :-

सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी 'नमो शेतकरी महासन्मान निधी' ही योजना घोषित करण्यात आली होती. केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने अंतर्गत देण्यात येणा-या प्रति वर्ष, प्रति शेतकरी रु.६०००.०० या अनुदानामध्ये राज्य शासनाची आणखी रु.६०००.०० इतक्या निधीची भर घालणारी "नमो शेतकरी महासन्मान निधी" ही योजना राबविण्यास संदर्भ क्र.(१) येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर योजने अंतर्गत लाभार्थींना लाभ अदा करणेसाठी एक व राज्यस्तरावर स्थापन करण्यात येणा-या राज्य प्रकल्प संनियंत्रण कक्षाच्या प्रशासकीय खर्चासाठी एक अशी एकूण दोन स्वतंत्र बचत खाती, आयुक्त (कृषि) यांचे नावे "बँक ऑफ महाराष्ट्र" या राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यास संदर्भ क्र.(२) येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. प्रस्तुत योजने अंतर्गत संदर्भ क्र.(३) अन्वये पहिला हप्ता (माहे एप्रिल ते जुलै) लाभार्थ्यांना अदा करण्यासाठी रु.१७२०.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. आता संचालक(वि.प्र.), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी संदर्भ क्र.(४) च्या पत्रान्वये केलेल्या विनंतीस अनुसरून नमो शेतकरी महासन्मान निधी योजने अंतर्गत दुसरा हप्ता (माहे ऑगस्ट ते नोव्हेंबर) लाभार्थ्यांना अदा करण्यासाठी रु.१७९२ कोटी इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

नमो शेतकरी महासन्मान निधी योजने अंतर्गत दुसरा हप्ता (माहे ऑगस्ट ते नोव्हेंबर) लाभार्थ्यांना अदा करण्यासाठी रु.१७९२ कोटी इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत खर्च पुढील लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ करिता मंजूर केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा-

**२४०१ - पीक संवर्धन**
**००**
**११५, लहान/सीमान्त शेतक-यांची आणि शेतमजुरांची योजना**
**(००)**
**(००)(०६) - नमो शेतकरी महासन्मान निधी योजना**
**(१००% राज्य योजना) (कार्यक्रम)**
**(२४०१ B४५५), ३३-अर्थसहाय्य**

३. सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणारा निधी संदर्भ क्र. (१) च्या शासन निर्णयात नमूद तरतूदीनुसार खर्च करण्याची जबाबदारी आयुक्त (कृषि) यांची राहील.

४. उपरोक्त प्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या निधीच्या विनियोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र आयुक्त (कृषि) शासनास सादर करतील.

५. प्रस्तुत योजनेच्या प्रयोजनार्थ आयुक्तालय स्तरावर आयुक्त (कृषि) यांना नियंत्रण अधिकारी व सहाय्यक संचालक, लेखा-१, यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

६. प्रस्तुत शासन निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभागाने त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनुक्रमे अनौसं. क्रमांक ७६/का.१४३१, दि.२५.१.२०२४ व अनौसं. क्रमांक ४१/२०२४/व्यय-१, दि.६.२.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक २०२४०२२११६५८१०२६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NEETA EKNATH SHINDE

Digitally signed by NEETA EKNATH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT,
2.5.4.20=f2bffd6992498e56663024368c72b33364cfb066d53682c53a425e54d187a7c1, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F325D659F47933958AA2D98F394DB95F94BE57548776492BA36E77EA1C4AA53B, cn=NEETA EKNATH SHINDE
Date: 2024.02.21 17:07:46 +05'30'

**( निता शिंदे )**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
४. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
५. सर्व मा.विधानसभा / मा. विधानपरिषद सदस्य
६. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,मंत्रालय,मुंबई ३२

७. अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. अपर मुख्य सचिव (महसूल ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
९. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुमविभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१०.प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१२. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१३. महासंचालक, माहिती व ज नसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१४. सर्व विभागीय महसूल आयुक्त (कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर)
१५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. सर्व जिल्हाधिकारी
१७. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
१९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२०. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरिक्षा ), मुंबई.
२१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, ( लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई
२२. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरिक्षा ), नागपूर
२३. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता),नागपूर
२४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२५. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
२६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
२७. सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२८. सर्व तहसिलदार
२९. सर्व तालुका कृषि अधिकारी
३०. निवडनस्ती, कार्यासन ११-अे.